**ठळक बातम्या**

- आगामी वर्षात देश नवी आशा आणि संकल्पांसह पुढे जाण्यासाठी सज्ज असल्याचं प्रधानमंत्र्यांचं मन की बात मधे प्रतिपादन

- मुख्य सचिवांच्या पाचव्या राष्ट्रीय परिषदेचा आज समारोप

- अरावली पर्वत रांगांच्या नव्या व्याख्येवर पर्यावरण तज्ज्ञांच्या आक्षेपाची सर्वोच्च न्यायालयाकडून दखल, उद्या सुनावणी होणार

- म्यानमारमधे सार्वत्रिक निवडणुकीसाठीच्या पहिल्या टप्प्यातलं मतदान आज सुरू

**आणि**

- महिला क्रिकेटमध्ये, तिरुअनंतपुरम इथल्या ग्रीनफिल्ड आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर आज भारत आणि श्रीलंका यांच्यात सामना रंगणार

**<><><><><>**

२०२५ या सरत्या वर्षानं भारताला मोठा आत्मविश्वास दिला असून, आता देश २०२६ मध्ये नवी आशा आणि नव्या संकल्पांसह पुढे जाण्यासाठी सज्ज असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. ते आज आकाशवाणीवर 'मन की बात' या कार्यक्रमातून देशवासियांशी संवाद साधत होते. हा या कार्यक्रमाचा १२९ वा भाग होता. २०२५ या वर्षाने प्रत्येक भारतीयाला अभिमान वाटायला लावणारे क्षण दिल्याचं त्यांनी यावेळी सांगितलं.

**होल्ड बाईट MKB MAJBOOT THASA**

सरत्या वर्षातलं ऑपरेशन सिंदूर प्रत्येक भारतीयासाठी अभिमानाचं प्रतीक बनलं असून, आजचा भारत आपल्या सुरक्षेशी कोणतीही तडजोड करत नाही, हे जगानं पाहिल्याचं प्रधानमंत्र्यांनी सांगितलं.

क्रीडा क्षेत्रासाठी २०२५ हे वर्ष संस्मरणीय ठरल्याचं नमूद करून, प्रधानमंत्र्यांनी भारताच्या पुरुष क्रिकेट संघानं जिंकलेली आयसीसी चॅम्पियन्स करंडक स्पर्धा, महिला क्रिकेट संघाचं पहिलंवहिलं विश्वजेतेपद, दृष्टीहीन महिला क्रिकेट संघानं जिंकलेली पहिली टी-२० विश्वचषक स्पर्धा या यशाचा गौरवपूर्ण उल्लेख केला.

शुभांशु शुक्ला, हे आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर जाणारे पहिले भारतीय बनले, भारतात चित्यांची संख्या आता ३० पेक्षा अधिक झाली आहे, प्रयागराज महाकुंभचं आयोजन आणि अयोध्येत राम मंदिरावर ध्वजारोहण कार्यक्रमाने प्रत्येक भारतियाचा ऊर अभिमानानं दाटून आल्याचं ते म्हणाले.

देशातल्या युवा शक्तीमुळे जग भारताकडे मोठ्या आशेने पाहत आहे, विज्ञान क्षेत्रातली आपली कामगिरी, नाविन्यपूर्ण संशोधन, तंत्रज्ञानाचा विस्तार यामुळे जगभरातले देश खूप प्रभावित झाले असल्याचं ते म्हणाले. जगभरातली भारतीय युवा पिढी आपली संस्कृती आणि वारसा, याच्याशी घट्ट जोडलेली असावी, आपली संस्कृती आणि वारशाचं जतन संवर्धन करावं यासाठी करत असलेल्या प्रयत्नांची माहितीही प्रधानमंत्र्यांनी दिली. देशाच्या स्वातंत्र्यात योगदान देणाऱ्या अज्ञात व्यक्तीमत्वांबद्दल समजून घेण्यासाठी सरकारनं तयार केलेल्या विशेष संकेतस्थळाला भेट देण्याचं आवाहन त्यांनी केलं.

आपल्या पारंपरिक कला या समाजाच्या सक्षमीकरणासह, लोकांच्या आर्थिक प्रगतीचं मोठं माध्यम बनल्याचं सांगून, त्यांनी याबाबत देशभरात सुरु असलेल्या विविध प्रयत्नांची माहिती दिली.

२०२५ मधला हा 'मन की बात' चा शेवटचा भाग असल्याचं नमूद करून, २०२६ हे वर्ष 'विकसित भारत' या संकल्पाच्या पूर्ततेच्या प्रवासातला एक महत्त्वाचा टप्पा ठरो अशा शुभेच्छा त्यांनी दिल्या.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली नवी दिल्लीत सुरू असलेल्या मुख्य सचिवांच्या पाचव्या राष्ट्रीय परिषदेचा आज समारोप होत आहे. राज्य आणि केंद्र भागीदारी मजबूत करणं हे याचं उद्दिष्ट आहे.

या परिषदेत सहा विशेष सत्रं आयोजित करण्यात आली. यानुसार राज्यांमधील नियमनमुक्ती, प्रशासनातील तंत्रज्ञान - संधी, धोके आणि निवारण, स्मार्ट पुरवठा साखळी आणि बाजारपेठ जोडणीसाठी ॲग्रीस्टॅक, एक राज्य, एक जागतिक दर्जाचं पर्यटन स्थळ, आत्मनिर्भर भारत आणि स्वदेशी या मुद्द्यांवर भविष्यातली धोरणं निश्चित करण्यावर चर्चा झाली.

या परिषदेत सर्व राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांचे मुख्य सचिव, वरिष्ठ अधिकारी आणि क्षेत्रातील तज्ज्ञ सहभागी झाले आहेत.

**<><><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु यांनी आज कर्नाटकातल्या कारवारमधल्या कदंब नौदलतळाला भेट दिली. कर्नाटकचे राज्यपाल थावरचंद गेहलोत यांनी त्यांचं स्वागत केलं. नौदलतळाला भेट दिल्यानंतर राष्ट्रपतींनी आएनएस वाघशील पाणबुडीतून प्रवास केला. नौदलप्रमुख ॲडमिरल दिनेश त्रिपाठी त्यांच्यासोबत होते. पाणबुडीतून प्रवास करणाऱ्या त्या माजी राष्ट्रपती एपीजे अब्दुल कलाम यांच्यानंतरच्या दुसऱ्या राष्ट्रपती आहेत.

राष्ट्रपतींच्या दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर चोख बंदोबस्त ठेवला असून अठरा किलोमीटर परिसरात मासेमारी बंद करण्यात आली आहे.

आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
२८ डिसेंबर २०२५ - रविवार

**<><><><><>**

अरावली पर्वत रांगांच्या नव्या व्याख्येवरून पर्यावरण तज्ज्ञ आणि सामाजिक संघटनांनी व्यक्त केलेल्या चिंतेची सर्वोच्च न्यायालयानं दखल घेतली असून, सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्यकांत, न्यायमूर्ती जे.के. माहेश्वरी आणि ए.जी. मसीह यांचा समावेश असलेल्या सुट्टी-कालीन पिठासमोर उद्या या प्रकरणाची सुनावणी होणार आहे. अरावली पर्वतरांगांच्या नव्या व्याख्येवर मोठ्या प्रमाणात निषेध आणि आक्षेप नोंदवला गेल्याच्या पार्श्वभूमीवर न्यायालयानं हा हस्तक्षेप केला.

नुकत्याच स्वीकारण्यात आलेल्या नव्या व्याख्येनुसार, अरावली टेकड्यांमध्ये समुद्रसपाटीपासून कमीतकमी १०० मीटर आणि त्यापेक्षा जास्त उंची असलेला आणि त्याला जोडणारा उतार असलेला भूप्रदेश समाविष्ट करण्यात आला आहे. पर्यावरण संस्था आणि सामाजिक संघटनांनी  या व्याख्येवर तीव्र आक्षेप नोंदवला आहे. अरावली टेकड्यांबाबतचे निकष सौम्य केल्यामुळे या भागातलं  खाणकाम आणि बांधकाम प्रकल्पांना वैधता मिळेल, आणि त्यामुळे पर्यावरणाची  अपरिमित हानी होईल, असा इशारा त्यांनी दिला  आहे.

दरम्यान, ज्येष्ठ काँग्रेस नेते जयराम रमेश यांनी केंद्रीय पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्री भूपेंद्र यादव यांना पत्र लिहिलं असून, अरवली टेकड्यांच्या नव्यानं करण्यात आलेल्या व्याख्येबद्दल चिंता व्यक्त केली आहे.

**<><><><><>**

विकसित भारताचं उद्दिष्ट गाठण्यासाठी  केंद्र सरकारनं यावर्षी विविध उपक्रम राबवले आहेत.  नव्या भारताच्या उभारणीसाठी कोणकोणती धोरणं आखण्यात आली याविषयी जाणून घेऊया….

**--------------व्हीसी----------------**

*(भारताच्या विकासाच्या प्रवासात २०२५ हे वर्ष अतिशय महत्त्वाचं ठरलं. रेल्वे, रस्ते, विमान वाहतूक, सागरी वाहतूक अशा सर्व क्षेत्रांमधल्या पायाभूत सुविधांमधे यावर्षी मोलाची भर*

*पडली. दुर्गम भागापासून मोठ्या शहरांपर्यंत संपर्काचं जाळं तयार झालं. पायाभूत सुविधांसाठी सरकारने केलेली भांडवली गुंतवणूक चालू आर्थिक वर्षात सव्वा अकरा लाख कोटी रुपयांपर्यंत पोहोचली. याचा जीडीपीमधला वाटा ३ पूर्णांक एक दशांश टक्के आहे, तर २०४७ पर्यंत प्रत्येक १२ ते १८ महिन्याला जीडीपीमधे एक ट्रिलियन डॉलरची वाढ होण्याचा अंदाज आहे. या वर्षात आर्थिक वाढीमधे पायाभूत सुविधांचा वाटा महत्त्वाचा असल्याचं सांगितलं जात आहे. नवी मुंबईमधल्या आंतरराष्ट्रीय विमानतळासह १६० पेक्षा जास्त नवीन विमानतळं, तमिळनाडूमधला समुद्री पूल, नौदलामधल्या पायाभूत सुविधा, ९९ टक्के रेल्वेचं विद्युतीकरण अशा अनेक पायाभूत सुविधांची या वर्षात भर पडली. त्यामुळे विकसित भारताच्या उद्दिष्टाकडे देशाची दमदार वाटचाल सुरू असल्याचं दिसून येतं.)*

**<><><><><>**

म्यानमारमधे सार्वत्रिक निवडणुकीसाठीच्या पहिल्या टप्प्यातलं मतदान आज सुरू आहे. माजी अध्यक्ष एँग सॅन सु की यांची राजवट लष्कराने २०२१ ला उलथून टाकल्यानंतरची ही पहिलीच निवडणूक आहे. ३३० टाऊनशीपपैकी १०२ टाऊनशीपमधे आज मतदान होत असून ५६ टाऊनशीपमधलं मतदान रद्द करण्यात आलं आहे.या भागात लष्कर आणि काही वांशिक गटांमधे सशस्त्र संघर्ष सुरू असल्याने याठिकाणी मतदान होणार नाही. दुसऱ्या टप्प्यातलं मतदान ११ जानेवारीला तसंच तिसऱ्या टप्प्यातलं मतदान २५ जानेवारीला होणार आहे.

**<><><><><>**

महिला टीट्वेंटी क्रिकेटमध्ये, भारत - श्रीलंका यांच्यातल्या पाच सामन्यांच्या मालिकेतला चौथा सामना आज केरळमध्ये तिरुअनंतपुरम इथल्या ग्रीनफिल्ड आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर खेळला जाणार आहे. संध्याकाळी सात वाजता सामन्याला सुरुवात होईल.

हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखाली भारतीय संघानं ५ सामन्यांच्या मालिकेत ३-० अशी आघाडी घेतली आहे. मालिकेतला ५ वा सामना येत्या मंगळवारी होणार आहे.

**<><><><><>**

ग्वाटेमालामधे, प्रवासी बस दरीत कोसळून झालेल्या अपघातात पंधरा जणांचा मृत्यू झाला असून १९ जण जखमी झाले आहेत. मृतांमधे तीन महिला आणि एक अल्पवयीनाचा समावेश आहे. जखमींना रुग्णालयात दाखल करण्यात आल्याची माहिती ग्वाटेमालामधल्या अग्निशमन दलाच्या प्रवक्त्याने दिली. दाट धुक्यामुळे हा अपघात झाल्याचं सांगितलं जात आहे.

**<><><><><>**

रशिया आणि युक्रेनमधला वाढत तणाव, आणि या प्रदेशात शांतता राखण्यासाठी सुरु असलेल्या अमेरिकेच्या प्रयत्नांच्या पार्श्वभूमीवर, युक्रेनचे अध्यक्ष वोलोदिमिर झेलेन्स्की आज फ्लोरिडामध्ये अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची भेट घेणार आहेत. या बैठकीत २० कलमी शांतता योजना आणि अमेरिकेच्या संभाव्य सुरक्षा हमीवर चर्चा होईल.

**//<><><><><>//**